**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (Maharashtra State Rural Livelihoods Mission, MSRLM) राबविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, MSRLM यांना विभाग प्रमूख म्हणून घोषित करण्याबाबत व अभियानाच्या खर्चाचे वितरण करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे**

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय. क्रमांक:एनआरएलएम-२०११/प्र.क्र.२८७/योजना-३
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : ५ नोव्हेंबर, २०११

__वाचा__ :- शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक:एनआरएलएम-२०११/प्र.क्र.१९६/ योजना-३, दिनांक १८ जुलै, २०११

__प्रस्तावना__ : -

दारिद्र्य निर्मूलनाच्या हेतूने सन १९९९ पासून सुरु असलेल्या स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार या ७५% केंद्र व २५% राज्य पुरस्कृत योजनेचे रुपांतर राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात (National Rural Livelihoods Mission NRLM) करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असून त्यानुसार राज्यात राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (State Rural Livelihoods Mission SRLM) राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्याबाबतचा शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक:एनआरएलएम-२०११/प्र.क्र.१९६/ योजना-३, दिनांक १८ जुलै, २०११ निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार प्रथमत: प्रत्येक महसूल विभागामध्ये सर्वात कमी मानवी निर्देशांक असलेल्या एका जिल्ह्यातील काही ब्लॉक भागात (Clusters) व ग्राम पंचायतीत हे अभियान सुरु करण्यात येईल, असा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार, पहिल्या टप्प्यात रत्नागिरी, नंदूरबार, सोलापूर, जालना, यवतमाळ व गडचिरोली या जिल्ह्यातील ठराविक ब्लॉक मध्ये काही ग्राम पंचायत समुहात (Clusters) हे अभियान राबविण्याची टप्प्याटप्प्याने सर्व जिल्ह्यांचा व ब्लॉक्सचा समावेश अभियानात करण्यात येणार आहे. सदर अभियान मिशन मोडमध्ये चालवावयाचे असून त्यासाठी अभियान मंडळाची (SRLM) स्थापना करण्यात आली आहे. या अभियान मंडळाची प्रशासकीय रचना दिनांक १८ जुलै, २०११ च्या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ट-४ मध्ये दर्शविली आहे.

२. या अभियानासाठी केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वातील chapter X अन्वये निधी प्राप्त होण्यासाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे, शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे:-

__शासन निर्णय :-__

अ) या अभियानासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचे आहरण व वितरण करण्यासाठी मुख्यालयाच्या ठिकाणी नवी मुंबई येथे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये अभियान संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, यांचे नावाने (पदनामाने) एक current खाते उघडण्यात यावे.

ब) राज्यस्तरावर अभियान राबविण्यासाठी राज्य अभियान संस्था स्थापन करण्यात आली आहे. या संस्थेचे प्रमूख मुख्य कार्यकारी अधिकारी, हे भारतीय प्रशासन सेवेतील ज्येष्ठ अधिकारी असुन



D:\datare disk\NRLMSanction to Bank Account Open to Miston.lwp-11

त्यांना विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात येत आहे व विभाग प्रमुख म्हणून या खात्यात करावयाच्या सर्व व्यवहारासाठी अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य जीवनोन्नती अभियान यांना पूर्ण अधिकार असतील.

क) विभाग प्रमुख या नात्याने बँक खात्याचे आहरण व संवितरण अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य जीवनोन्नती अभियान हे असतील. त्यांनी कामाचा व्याप व आवश्यकता विचारात घेऊन, व्यवहार करण्यास त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यास अधिकार प्रदान करण्यास ते सक्षम असतील.

ड) प्राधिकृत केलेले अधिकारी, प्रत्येक महिन्याचे एकत्रित लेखे महालेखापालांशी चर्चा करुन, पध्दत ठरवून महालेखापाल, मुंबई यांना सादर करतील. त्यामध्ये महिनाभरात झालेला खर्च व त्या अनुषंगाने काढलेले धनादेश यांचा समावेश असेल. तसेच महालेखापाल, मुंबई हे जेव्हा जेव्हा मागणी करतील त्याप्रमाणे त्यांना केलेल्या खर्चाची प्रमाणके सादर करावी लागतील.

इ) वित्तीय नियम नमुना-२ नुसार झालेल्या जमा रकमेचा/ खर्च रकमेचा रोकड वही ठेवावी व रोकड वही वरील नोंदीचा क्रमांक उपप्रमाणकावर आवर्जून नोंदवावा. तसेच रक्कम अदा केल्यानंतर त्यांचा पुनर्उपयोग करता येऊ नये म्हणून ती विरुपीत करण्यात येईल.

फ) याद्वारे करावयाचा खर्च हा त्या त्या वर्षात उपलब्ध असलेल्या निधीच्या अधीन असेल. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे नांवे सदर खाते असल्याने ते याबाबतच्या सर्व प्रचलनासाठी जबाबदार असतील.

ग) या प्रकल्पासाठी सन २०१०-११ या चालू वित्तीय वर्षासाठी व तसेच यापुढे वेळोवेळी केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधी चा विनियोग कशाप्रकारे करावयाचा आहे, याबाबत राज्य अभियानाने केलेले नियोजन, राज्य स्तरीय कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधीन असेल.

ह) सदर खाते फक्त राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यासाठी व त्याअनुषंगाने येणाऱ्या खर्चासाठी वापरण्यात येईल. त्याचा हिशेब स्वतंत्र ठेवण्यात येईल.

इ) यावरील होणारा खर्च हा त्या त्या लेखाशिर्षातून प्राप्त होणाऱ्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येईल व त्या त्या वर्षीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने (त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक: २४२/११/कोषा-५, दिनांक २५ ऑक्टोबर, २०११ अन्वये ) निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकणक सांकेतांक २०११११०५१४३६०८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुधीर ठाकरे)
सचिव, ग्राम विकास विभाग

प्रत,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,



D:\data\e disk\NRLM\Sanction to Bank Account Open to Mision.lwp-12

प्रधान सचिव/सचिव, नियोजन/वित्त/सामाजिक न्याय/ आदिवासी विकास/महिला व बाल कल्याण/ सहकार/कृषि व पदुम/उद्योग,उर्जा व कामगार/आरोग्य/ शालेय शिक्षण/उच्च व तंत्र शिक्षण/रोजगार व स्वयंरोजगार, मंत्रालय, मुंबई.

महालेखापाल (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर (५ प्रतींसह)

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर (५ प्रतींसह)

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी

व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, बांद्रा(प.), मुंबई.

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,

सर्व उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय,

सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,

संचालक युनिसेफ/SIRD, पुणे/ जनरल मॅनेजर व निमंत्रक, राज्य अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र,पुणे.

आयुक्त, इन्स्टीटयूशनल फायनन्स/ पाणलोट/ महिला व बाल विकास समिती.

अध्यक्ष, नाबार्ड, बांद्रा (पूर्व), मुंबई.

संचालक, लेखा व कोषागरे, लेखा व कोषागार संचालनालय, मुंबई - २१,

सह संचालक, लेखा व कोषागरे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई - २१,

अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई २१.

जिल्हा कोषागार अधिकारी. (सर्व)

सह संचालक, एग्राविका कक्ष, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, (५प्रतींसह)

निवडनस्ती.